महासागर अमरावती

सोमवार, दि. 30 सप्टेंबर 2024

पान 3

# कौंडण्यपूर शेत शिवारात बिबट्याने पाच जनावरे केली फस्त

**महासागर प्रतिनिधी**

**कुऱ्हा,( दि.29 )-** कौंडण्यपूर शेत शिवारात गेल्या अनेक दिवसांपासून बिबट्याने दहशत पसरविली असून, एका बिबटने गेल्या दोन दिवसात शेतशिवारातील जवळपास पाच ते सहा जनावरे फस्त केली आहे.



भरदिवसा या बिबट्याचे जनावर हल्ले पाहून गावकर्यांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले आहे. बिबट्याच्या हल्ल्यामध्ये शेतकर्यांची जनावरे मरण पावल्याने त्यांच मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. या संदर्भात चांदुर रेल्वे वनपरिक्षेत्र अधिकारी यांना शेतकऱ्यानी माहिती दिली असून वनविभागाने लवकरात लवकर या बिबट्यांचा बंदोबस्त करावा. अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

# राष्ट्रभक्त मुस्लिमांना आमचा विरोध नाही !

## दगड मारणाऱ्यांना जशाच तसे उत्तर देवू ◆ धर्मसभेत नितेश राणे पुन्हा कडाडले

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.29 )-** गणपतीत दगड फेकणारे हात ज्यांनी पकडले, अश्या राष्ट्रभक्त मुस्लिमांचा आम्हाला विरोध नाही, परंतू ज्यांनी दगड फेकले त्यांना जशाच तसे उत्तर देवू. अश्या लोकांकरिता आम्ही सर्वधर्म समभाव मानत नाही, हिंदूकडे जो वाकड्या नजरेने पाहील त्यांचा विचार आम्ही करणार नाही, असे पुन्हा वादास्पद वक्तव्य आ.नितेश राणे यांनी केले. ते रविवारी (दि.29) रोजी अचलपूर येथील कृषी उत्पन्न बाजार समिती येथे शक्ती फाउंडेशन तर्फे आयोजित धर्मसभेत बोलत होते. यावेळी मंचावर खा.अनिल बोंडे, आयोजक प्रमोद गड्रेल, सागर बेट यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते. या धर्मसभेला हजारो लोकांनी उपस्थिती लावली होती.

संपुर्ण जिल्ह्याचे लक्ष या धर्मसभेवर लागलेले होते. कारण काही ठिकाणी नितेश राणे यांच्या भाषणामूळे दोन गटात तेढ निर्माण झाल्याच्या घटना समोर आल्या आहेत. त्यामूळे त्यांना सांप्रदायिकदृष्टीने मिश्र वस्ती असलेल्या अचलपूर येथे बाईक रॅली व सभा घेण्यास काही लोकांकडून विरोध केला जात होता. तर दुसरीकडे आयोजकही सभा घेण्यावर अडून असल्याने कडेकोट पोलीस बंदोबस्तात या कार्यक्रमाला परवानगी देण्यात आली. यावेळी आयोजक प्रमोद गड्रेल यांनी त्यांच्या या आयोजनाला विरोध करणाऱ्या हिंदू व्यक्तींवर ताशेरे ओढत त्यांनी आपला डीएनए तपासावा अशी सल्ला दिली. सोबतच अश्या व्यक्तीचा हिशेब चुकता केल्या जाईल असा धमकीवजा इशाराही त्यांनी आपल्या भाषणातून यावेळी दिला. तसेच मी सदैव खऱ्या हिंदूच्या पाठीशी राहणार असल्याचे आवाहन त्यांनी आपल्या भाषणातून केले.



### आगामी काही दिवस कडेकोट पोलीस बंदोबस्त

आ.राणे यांच्या भाषणामूळे दोन धर्मात तेढ निर्माण होण्याची भीती निर्माण झाल्याने आगामी काही दिवस अचलपूर-परतवाडा येथे लावण्यात आलेला पोलीस बंदोबस्त तसाच ठेवण्यात येणार आहे. समाज माध्यमांवर पोलीसांची करडी नजर असून समाज माध्यमांवर वादास्पद पोस्ट करणाऱ्यांवर गुन्हा दाखल केला जात आहे.

### पोलीस अधिक्षकांनी केले शांततेचे आवाहन



काही लोकांमार्फत समाज माध्यमांवर वादास्पद वक्तव्य करुन दोन समाजात तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. अशा लोकांवर आम्ही तातडीने कारवाई केली असून सर्वांनी शांतता राखावी, जो कुणी कायदा हातात घेण्याचा प्रकार करेल त्याला माफ केले जाणार नाही, असे आवाहन पोलीस अधिक्षक विशाल आनंद यांनी केले.

### गुन्हा दाखल होण्याची शक्यता

आ.नितेश राणे यांच्या भाषणानंतर अचलपूर ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रीया सुरु होती. परंतू बातमी लिहेस्तोवर गुन्हा दाखल झाला नव्हता. आतापर्यंत नितेश राणे यांची सभा ज्या-ज्या ठिकाणी झाली, त्या-त्या ठिकाणी त्यांच्यावर गुन्हे दाखल करण्यात आले, हे विशेष.

### फेसबुकवर आक्षेपार्ह वक्तव्य

सभेपुर्वी आ.नितेश राणे यांची काढण्यात आलेल्या बाईक रॅलीचे फेसबुक लाईव्ह होत असताना काही लोकांनी त्यावर एका विशिष्ट समाजाबद्दल आक्षेपार्ह वक्तव्य केल्याने परतवाडा पोलिस स्टेशनमध्ये त्या व्यक्तीविरोधात गुन्हा दाखल करुन पोलिसांनी पुढील कारवाई केली.

### जिहादींना सोडू नका!

आ.राणे म्हणाले की, काही विशिष्ट गटातील युवक आगामी नवरात्री उत्सवांमध्ये दांडीया खेळायला येण्याचे नाटक करुन लव जिहाद चा घाट घालतील अश्या युवकांचा बंदोबस्त करावा, त्यांचे हातपाय तोडून त्यांना पोलिसात द्या, त्यांना सोडू नका. असेही आवाहन त्यांनी तरुणींना यावेळी केले.

### अचानक आवाज बिघडला

आ.नितेश राणे यावेळी पुर्ण त्वेषात भाषण देत असताना अचानक त्यांचा आवाज बिघडला, ते पाणी पिले, काही तरी गोड खाल्ले तरीही त्यांचा आवाज जाग्यावर आला नाही, अखेर त्यांनी मोबाईलचा टॉर्च दाखवून सर्व उपस्थित नागरिकांनी आपल्या मोबाईलचा टॉर्च दाखवायला लावला, आणि आपले भाषणाला विराम दिला.

### अनेक वादास्पद वक्तव्य

यावेळी आ.राणे यांनी अनेक वादास्पद वक्तव्य आपल्या भाषणातून केले. जुळ्या नगरीसह जिल्ह्यातील सामाजिक सलोख्याला नख लावणारे हे वक्तव्य असल्याने समाजभान राखत 'दै.महासागर' हे वक्तव्य छापणे टाळत आहे.

# अघोषीत संचारबंदी, भीती, उत्साह अन् शक्तीप्रदर्शन

## अचलपूरातील अनेक कुटूंबे गेली बाहेरगावी



**महासागर प्रतिनिधी**

**परतवाडा,( दि.29 )-** आ. नितेश राणे यांच्या बाईक रॅली व सभेला होत असलेला विरोध पाहत पोलीस प्रशासनाने प्रचंड तयारी केली. 1300 पोलीस या कार्यक्रमामूळे अचलपूरात दाखल होवून दोन दिवसांपासून रुट मार्च करित होती. अश्यातच कार्यक्रमाच्या दिवशी रविवारी(दि.29) अचलपूर, परतवाडा शहरात सकाळपासूनच अघोषीत संचारबंदी लागलेली पहायला मिळाली, 90 टक्के दुकाने उघडलीच नाही, अनेकांच्या मनात सांप्रदायिक वादाची भीती होती, त्यामूळे त्यांनी आपले कुटूंब बाहेरगावी नेवून ठेवले, तर दुसऱ्या बाजूने या कार्यक्रमाचा उत्साह होता, बाईक रॅलीच्या माध्यमातून ऐतिहासिक शक्तीप्रदर्शन यावेळी करण्यात आले.

दुपारी 4.40 मिनिटांनी अचलपूर नाक्यावरुन बाईक रॅलीला सुरुवात झाली. यावेळी शहरातील चौकाचौकात प्रचंड पोलीस बंदोबस्त लावला होता. डिजे वाजत असलेले वाहन, त्यानंतर भगवे झेंडे लावलेल्या दुचाकी, नितेश राणे यांचे खुले वाहन, त्यानंतर आणखीन प्रचंड मोठी दुचाकींची रांग असे या रॅलीचे स्वरुप होते. किमान तीन किलोमीटरपर्यंतची ही रॅली असावी, असा अंदाज व्यक्त केल्या जात आहे. चांदुर नाका अचलपुर नाका माळवेशपुरा गेट-बियाबाणी-पो.स्टे. अचलपुर-झेडा चौक तहसिल कार्यालय-जयस्तंभ चौक-सदर बाजार-टि.व्ही.टावर चौक नृसिग मंदीर ते कृषी उत्पन्न बाजार समिती, अचलपुर येथील सभास्थळी ही रॅली पोहोचली. 'जय श्रीराम' चे जयघोषांने यावेळी आसमंत दणाणून गेला होता.

# सिटीलॅंड, बिझीलॅंडमधील बालकामगारांची सुटका

## कामगार अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत कारवाई

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि.29 )-** कापड मार्केट असलेले सिटीलॅंड आणि बिझीलॅंडमध्ये अनेक बालकामगार काम करीत आहेत. बालकांच्या परिस्थितीचा फायदा घेत अत्यल्प वेतनावर अनेक दुकानांमध्ये बालकामगारांना कामावर ठेवल्या जात असल्याचा प्रकार शनिवारी सायंकाळी उघडकीस आला. चाईल्ड लाईनसह कामगार अधिकार्याच्या उपस्थितीत भीम ब्रिगेडने दहा ते बारा बालकामगारांची मुक्तता केली आहे. या प्रकारामुळे बाल न्याय हक्क संदर्भातील शासनाच्या नियमावलीला दुकानमालकांनी तिलांजली दिल्यामुळे त्यांच्यावर दंडात्मक कारवाईची मागणी भीम ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष प्रवीण मोहोड यांनी यावेळी केली.



बिझिलॅंड आणि सिटीलॅंड मधील अनेक दुकानांमध्ये कायद्याचे उल्लंघन करत मालकांनी अत्यल्प वेतनावर बालकामगार कामावर ठेवल्याची माहिती भीम ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष प्रवीण मोहोड यांना मिळाली होती. प्रवीण मोहोड यांनी याबाबत कामगार आयुक्त व जिल्हा कामगार अधिकारी यांना लेखी तक्रार देऊन कारवाईची मागणी केली होती. तरीसुद्धा कामगार आयुक्त व अधिकार्यांनी या गंभीर प्रकरणाची दखल न घेतल्याने शनिवारी प्रवीण मोहोड, संस्थापक अध्यक्ष राजेश वानखडे व भीम ब्रिगेड च्या कार्यकर्त्यांनी अचानक सिटीलॅंड मधील समता क्रिएशन, माहेरा क्रिएशन, वानी , मन्नत, रोनक, डि.के कपडा प्रतिष्ठान याठिकाणी धाडी टाकून काम करणार्या बालकामगारांची मुक्तता केली.

# वाहतुक शाखेसमोरील झाडावर धडकली शहर बस

## गेल्या दोन महिन्यात शहर बसचा तिसरा अपघात

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.29 ) -** इर्विन चौकाजवळील शहर पोलीस वाहतूक शाखेच्या कार्यालयासमोरच असणार्या झाडावर सिटी बस धडकल्याने रविवारी सायंकाळी खळबळ उडाली. सुदैवाने जीवीतहानी टळली. गेल्या दोन महिन्यात शहर बसचा हा तिसरा अपघात असून, यापूर्वी बसस्थानक ते रुख्मिणीनगरकडे जाणाऱ्या मार्गावर शहर बसच्या धडकेत एका चिमुकल्याचा मृत्यू झाला होता.



रविवारी सायंकाळी गाडगे नगराकडून इर्विन चौकाकडे एम एच 27 ए 9938 या क्रमांकाची शहर बस जात होती. दरम्यान इर्विन चौकातील पेट्रोल पंपपासून एका कारने वाहतुक शाखेसमोरील रस्त्यावर युटर्न घेतले. त्याचवेळी शहर बस चालकाने कारला वाचविण्यात बस थेट झाडावरच नेली. कारण रस्त्यावर पुढे पायी जाणाऱ्या चार महिला होत्या. या धडकेने बसच्या दर्शनी भागाच्या काचा फुटल्या. सुदैवाने प्रवाशीही बचावले. या अपघातानंतर मोठा आवाज ऐकून वाहतुक शाखा कार्यालयातील वाहतूक पोलिसांनी सुद्धा धाव घेतली. या सोबतच इतर नागरिकांनी गर्दी केली. या घटनेची नोंद पोलिसांनी घेतली आहे.


# रखवालदाराच्या अल्पवयीन मुलीचे लैंगिक शोषण

## शेतमालकाच्या मुलाला अटक

**महासागर प्रतिनिधी**

**अंजनगांव सुर्जी, ( दि.29 )-** अंजनगांवसुर्जी येथील शेतातील पोल्ट्री फार्मवर रखवालीचे काम करणार्या एका इसमाच्या सतरा वर्षीय मुलीचे शेतमालकाच्या मुलाने लैंगिक शोषण केले. ही धक्कादायक घटना पिडीत मुलगी गर्भवती झाल्यामुळे उघडकीस आली. याप्रकरणात अंजनगाव सुर्जी पोलिसांनी आरोपी अमर अशोक रेखाते (39) याला अटक केली आहे.

अंजनगांव सुर्जीतील खोडगाव रोडवर रेखाते यांचे बागायती शेत असुन शेतीला जोडधंदा म्हणुन पोल्ट्रीचा व्यवसाय आहे. पोल्ट्रीच्या शेडवर देखभाल व देखरेखीस रखवालदार असून, ते पत्नी व



सतरा वर्षीय मुलीसोबत शेतातील झोपडीत गेल्या तीन वर्षापासुन रखवालीचे काम करीत राहतात. अमर हा शेतात ये-जा करीत असताना, त्याने रखवालदाराच्या मुलीचा प्रेमजाळ्यात फसविले आणि तिच्याशी शारिरिक संबंध प्रस्थापीत केले. दरम्यान ती मुलगी गर्भवती राहीली. तिच्या प्रकृती बिघडल्यानंतर, तिला रूग्णालयात तपासणीकरीता नेण्यात आले. त्यावेळी तिची प्रसुती झाली. त्यामुळे या घटनेची माहिती अंजनगाव सुर्जी पोलिसांना देण्यात आली. ग्रामीण रुग्णालयातील वैद्यकीय अधीकारी डॉ.अमोल नालट यांनी पोलीसांना पाचारण केले असता पोलीसांनी पिडीतेच्या बयाणावरून आरोपी अमर रेखातेविरुध्द विविध कलमान्वये गुन्हा दाखल करून आरोपीला अटक केली. पुढील तपास ठाणेदार प्रकाश अहीर यांचे मार्गदर्शनात तपास अधीकारी भाष्कर करीत आहेत.

> पीडीता ही दुसऱ्याच प्रकृतीच्या कारणाने चार दिवसापुर्वी ग्रामीण रुग्णालयात दाखल झाली होती. परंतु ती गर्भवती असल्याने तीला प्रसुती कळा सुरु झाली. याबाबतची माहिती पोलीसांना देण्यात आली. पिडित मुलीसह तिच्या बाळाला पुढील उपचारकरिता अचलपूर येथे पाठविण्यात आले आहे.
>
> **डॉ.अमोल नालट, वैद्यकीय अधीकारी, ग्रामीण रुग्णालय.**

# उभ्या ट्रकवर आदळला दुसरा ट्रक, तीन गंभीर

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.29 )-** भरधाव ट्रकने दुसर्या उभ्या ट्रकवर धडक दिल्याने तीन गंभीर जखमी झाले. ही घटना 28 सप्टेंबर रोजी रात्री 9.30 वाजताच्या सुमारास कुऱ्हा पोलिस ठाण्याच्या हद्दीत घडली. संत्रा भरण्यासाठी एक उभा होता. दरम्यान समोरून येणाऱ्या भरधाव ट्रकने त्या ट्रकला जोरदार धडक दिली. त्यामुळे या अपघातात तिघे जण गंभीर जखमी झाले. या घटनेची माहिती मिळताच कुर्हा पोलीसांसह गावातील नागरिकांनी घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी आयसर ट्रकच्या कॅबिनमध्ये अडकलेल्या दोघांना अन्य एकाला जेसीबीच्या साह्याने बाहेर काढले. तर ट्रकच्या मागे खाली बसलेल्या युवकांच्या पाय मागील ट्रकच्या चाकाखाली दबल्याने त्या सुध्दा उपस्थित नागरिकांनी मोठी कसरत करून काढावे लागले. या तिघांना उपचारासाठी अमरावती येथे पाठविण्यात आले. या अपघाताची नोंद कुऱ्हा पोलीसांनी घेतली आहे. परंतु अद्यापही तक्रार न आल्याने गुन्हा नोंदविण्याची प्रक्रिया झाली नव्हती.

# कौटुंबीक न्यायालयाने जुळविले तीन संसार

## राष्ट्रीय लोक अदालत

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि.29 )-** कौटुंबिक न्यायालयात 28 सप्टेंबर रोजी पार पडलेल्या राष्ट्रीय लोकअदालीत एकूण 25 प्रकरणे तडजोडीच्या सुनावणीसाठी ठेवण्यात आलेली होते. त्यापैकी 6 प्रकरणे निकाली काढण्यात यश आले असून, या प्रकरणातील तीन पक्षकारांचे संसार जुळविण्यात यश मिळविले आहे.

भांडणापेक्षा समझौता बरा, कौटुंबीक सौख्यातच आनंद खरा असा संदेश देवून निकाली काढलेल्या 6 प्रकरणांपैकी 3 प्रकरणांमध्ये संबंधीत पक्षकारांचा संसार जुळविण्यात आले असून, ते एकत्र संसार करण्यासाठी गेले. सदर प्रकरणी कौटुंबिक न्यायालयाच्या पुढाकाराने घटस्फोट टाळून संबंधीत पक्षकारांनी एकत्र संसार करण्याचा निर्णय घेतला. उर्वरीत 3 प्रकरणांमध्ये आपसी




सहमतीने तडजोड करण्यात आली. सदर लोकअदालतीमध्ये जिल्हा न्यायाधीश (3) पी.एन. राव यांनी पॅनल जज म्हणून कर्तव्य पार पाडले तसेच अधिवक्ता ॲड. डी. डी. लवणकर यांनी पॅनल सदस्य म्हणून काम पाहिले. सदर लोक अदालतीला प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश एस.व्ही. यार्लगड्डा, जिल्हा न्यायाधिश (1) ए.एन. लध्दड आणि अमरावती जिल्हा विधी सेवा प्राधिकरण सचिव एम. डी. कांबळे यांनी भेट दिली. लोक अदालत यशस्वी होण्यासाठी न्यायाधीश आर. आर. पोंदकुले यांच्या मार्गदर्शनात प्रभारी प्रबंधक विकास बोरोकार, न्यायालयीन व्यवस्थापक धनंजय क्षिरसागर, तसेच लघुलेखक रोशना कोल्हे, वरिष्ठ लिपीक वाय.व्ही. देशमुख, कनिष्ठ लिपीक स्नेहा इंगोले, शिपाई एस.आर. बाकडे इत्यादि कर्मच्यार्यांनी परिश्रम घेतले.

# सि.आय.यु. पथकाची वरली मटक्यावर धाड

**अमरावती-** पोलिस आयुक्तालयातील सीआययु पथकाने नांदगाव पेठ हद्दीतील वरली-मटका अड्डयावर शनिवारी धाड टाकली. पोलिसांनी आरोपी राहुल दिलीपराव मोहोड (36), निकेश जनार्दन तायडे (36), अशोक वाघजी वानखडे (62, तिन्ही रा. रहाटगाव), सुनिल लालसिंग कोल्हे (32, रा. डोमा, चिखलदरा), योगेश बबनजी राऊत (28, रा. करजगाव), पंकज चक्रधर भालेराव (33, रा. रहाटगाव) यांना ताब्यात घेतले असून, त्यांच्या ताब्यातून 11 हजार 900 रुपयांची रोख, दोन मोबाईल, वरली मटक्याच्या चिठ्या (बुक), असा एकुण 26 हजार 900 रुपये किमंतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.



आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती

मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक ( पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील ) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४

# शालेय गणवेशात विद्यार्थ्यांची थट्टा

**स्कर्ट आणि शर्ट एकत्र जोडला, कुणाला मोठे तर कुणाला लहान गणवेश**

## पालक मागताहेत टेलरचा पत्ता





**महासागर प्रतिनिधी**

**पथ्रोट, ( दि.29 )–** शासनाकडून देण्यात आलेल्या गणवेशात विद्यार्थ्यांची थट्टा करण्यात आल्याचे दिसत आहे. गणवेशाचे कापड हलक्या दर्जाचे असून ते अंदाजे शिवल्यामुळे ताळमेळ लागत नसल्याचे चित्र दिसून येत आहे. शर्टला स्कर्ट जोडून तयार केलेले हे गणवेश कोणाला लहान तर कोणाला मोठे, बाजू खालीवर, कुठे फाटलेले तर कुठे शिलाई उसवलेले अशा एक ना अनेक समस्या विद्यार्थ्यांना गणवेश घालताना येत आहे. त्यामूळे आता गणवेश शिवणाऱ्या टेलरचा शोध घेत आहेत.

राज्यातील शाळांमध्ये विद्यार्थ्यांना वाटप करण्यात आलेल्या गणवेशाचे फोटो सध्या सोशल मीडियावर व्हायरल होत आहेत. त्यातून शिक्षण विभागाचा भोंगळ कारभार चव्हाट्यावर आला आहे. सरकारची सर्व भिस्त ही कंत्राटदारावर असून पालक मात्र समस्यांनी त्रस्त असल्याचे दिसून येत आहेत. त्यामुळे त्यांच्याकडून तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे. शाळा सुरू होऊन तब्बल तीन महिन्यांनंतर शिक्षण विभागाकडून राज्यातील जिल्हा परिषदेसह अन्य स्थानिक स्वराज्य संस्थेच्या शाळेत शिक्षण घेत असलेल्या इयत्ता पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांना मोफत शालेय गणवेश वाटप करण्यात येत आहेत. मात्र, यामुळे येणार्याी अनेक समस्यांना शिक्षकांसह, मुख्याध्यापकांना समोरे जावे लागत आहे. या प्रकारामुळे शिक्षकही कंटाळले आहेत.

यापूर्वी शाळेच्या पट संख्येप्रमाणे प्रत्येकी दोन गणवेशांचे प्रत्येकी 300 रुपयांप्रमाणे जी रक्कम होईल, ती रक्कम शाळा व्यवस्थापन समितीच्या खात्यावर जमा केली जात होती. ती जमा झाल्यानंतर शाळा व्यवस्थापन समिती व मुख्याध्यापक कापडाची गुणवत्ता पाहून ते खरेदी करत प्रत्येक विद्यार्थ्यांचे माप घेऊन त्या मापात कपडे शिऊन घेत. त्यामुळे स्वातंर्त्यदिनापूर्वी विद्यार्थ्यांना शालेय गणवेशाचे वाटप होत होते. मात्र, चालू वर्षी शिक्षण मंत्रालयाने संपूर्ण बदलाचे धोरण स्वीकारून गणवेशाचे हे काम एका खाजगी कंपनीला दिले. त्यामुळे अनेक समस्या उद्भवत असल्याचे सांगण्यात येत आहे.

### शर्टचा रंग वेगळा आणि बाह्या वेगळ्या रंगाच्या

विद्यार्थिनींना दिलेले शर्ट आणि स्कर्ट एकत्र जोडले आहेत. त्यामुळे व्यवस्थित होत नाहीत. गळ्यामध्ये व्यवस्थित नाहीत, मुलांच्या गणेवशाचे मोजमाप कमी आहे. कलर एक अन् शर्टच्या बाह्या दुसऱ्याच रंगाच्या असल्याचे शालेय गणवेशात दिसून येत आहे. या सगळ्या प्रकारात शालेय गणवेश कुणाला बसतात, तर बऱ्याच विद्यार्थ्यांना ते छोटे किंवा मोठे होतात, अशी परिस्थिती आहे. त्यामुळे शालेय गणवेशात सावळा गोंधळ निर्माण झाला असून, पालकांमध्ये नाराजी पसरली आहे. तर शिक्षकांची मात्र पालकांना उत्तरे देताना नाहक डोकेदुखी वाढली आहे.

# धामणगाव गढी आरोग्य केंद्राची इमारत शिकस्त

**जिल्हा परिषदेच्या सीईओ संचिता मोहपात्रा कडून पाहणी**



**महासागर प्रतिनिधी**

**चुरणी,( दि.29 ) –** ग्रामीण आरोग्याची मदार असलेल्या जिल्ह्यातील बहुतेक प्राथमिक आरोग्य केंद्रांची अवस्था अत्यंत वाईट आहे. ज्यामध्ये अचलपूर तालुक्यातील धामणगाव गढी येथील प्राथमिक आरोग्य केंद्राचा सामावेश आहे. ही इमारत धोकादायक झाल्याने नवीन इमारत बांधण्यासाठी मंजुरात द्यावी अशी मागणी ग्रामपंचायत सदस्य विमल फाटकर यांनी केली होती. त्याच अनुषंगाने शुक्रवारी सीईओ यांनी धामणगाव गढी आरोग्य केंद्राला भेट देऊन पाहणी केली.

अचलपूर तालुक्यातील सर्वात मोठे आरोग्य केंद्र म्हणून धामणगाव गढीचे नाव घेतल्या जाते. आज त्याच प्राथमिक आरोग्य केंद्राची इमारत जीर्ण झाली आहे. या इमारतीला तब्बल 35 वर्ष झाली ज्यामुळे इमारतीच्या काही भाग अत्यंत शिकस्त झाला आहे.

परिणामी येथील आरोग्य कर्मचाऱ्यांना जीव मुठीत सेवा द्यावी लागत आहे, त्याशिवाय रुग्णांच्या जीवलाही धोका निर्माण झाला आहे. या आरोग्य केंद्रावर जवळपास 45 गावांचा डोलारा आहे. सोबतच मेळघाट लागून असल्याने पाच–सहा गावातील रुग्ण येथे उपचारासाठी दाखल होतात, त्यामुळे कोणतीही अनुचित घटना घडण्यापूर्वी शासनाने ही इमारत पाडून नव्याने इमारत बांधण्याची मागणी धामणगाव गढीच्या ग्रामपंचायत सदस्या विमल फाटकर यांनी केली होती. त्याच अनुषंगाने सीईओ संचिता मोहपात्रा यांनी आरोग्य केंद्राला भेट देऊन पाहणी केली, तसेच कर्मचाऱ्यांच्या समस्या जाणून घेतल्या व त्यानंतर पुढील दौऱ्यासाठी चिखलदराकडे रवाना झाल्या.

धामणगाव गढी येथे ग्रामीण रुग्णालय प्रस्तावित आहे. त्यामुळे तीन–चार महिने वाट पाहून नंतर निर्णय घेऊ एकतर ग्रामीण रुग्णालयाची इमारत बांधू नाहीतर आरोग्य केंद्राची इमारत उभी करु

**संचिता मोहपात्रा,**
**मुख्यकार्यकारी अधिकारी, जि.प.अमरावती.**

# शिक्षकाच्या घरी 45 हजारांची चोरी

**अमरावती –** गाडगेनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील दत्त विहार कॉलनीत घरफोडी झाल्याची घटना 27 सप्टेंबर रोजी उघडकीस आली. अज्ञात चोरांनी महिला शिक्षिकेच्या घरातील बेडरूममध्ये प्रवेश करून, कपाटातून 45 हजारांची रोख चोरून नेली. शिक्षकाच्या तक्रारीवरून पोलिसांनी अज्ञाताविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.


# राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांचा दौरा



**अमरावती–** राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन गुरूवार, दि. 3 ऑक्टोबर रोजी जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत आहेत. त्यांच्या दौऱ्यानुसार, राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांचे गुरूवार, दि. 3 ऑक्टोबर रोजी दुपारी 3.15 वाजता अमरावती हेलिपॅड येथे आगमन होईल. त्यानंतर दुपारी 3.25 वाजता अमरावती येथील शासकीय विश्रामगृह येथे आगमन होईल. त्यानंतर सायंकाळी चार ते सहा वाजेपर्यंत विविध घटकांशी भेटी घेऊन चर्चा करतील. त्यांचा गुरूवारी अमरावती येथे मुक्काम राहणार आहे. शुक्रवार, दि. 4 ऑक्टोबर रोजी सकाळी 9.30 वाजता विश्रामगृह येथून हेलीपॅडकडे प्रयाण करतील. त्यानंतर सकाळी 9.40 वाजता अमरावती हेलीपॅड येथून शासकीय हेलीकॉप्टरने वाशिमकडे प्रयाण करतील.

# आरोग्य मंदिर बनले शोपीस





**महासागर प्रतिनिधी**

**चांदूर बाजार,( दि.29 )–** जनसामान्य या उत्तम आरोग्य सेवा मिळावी यासाठी राज्य सरकार कोट्यवधी रुपये खर्च करत असतात मात्र आपल्या जबाबदारी प्रति सजग न राहता कामात हलगर्जीपणा केला जात, असल्याचे अनेक उदाहरणे आपण जिल्ह्यातील अनेक भागात पाहिले आहे. अशाच काहीशा प्रकार हा चांदूर बाजार तालुक्यातील शिरजगाव कसबा येथील आरोग्य मंदिर बाबत पाहायला मिळत आहे. कोट्यवधी रुपये खर्च करून इमारत बांधकाम आणि साहित्य पुरविले मात्र ते सर्व कोणासाठी आहे हे डॉक्टरांची वेळेवर अनुउपस्थित वरून प्रश्न तयार होते आहे.

शिरजगाव कसबा ते ब्राम्हणवाडा थडी रोडवर स्थित असलेले आरोग्य केंद्र मंदिर परिसरातील नागरिकांच्या आरोग्यासाठी बांधण्यात आले आहे की अधिकारी, कर्मचारी यांचे मौज मस्तीसाठी आहे अशी चर्चा सुरू झाली आहे. शासन हे नागरिकांच्या आरोग्यासाठी मोठ्या प्रमाणात खर्च करीत आहे. दुसरीकडे मात्र शिरजगाव कसबा येथील आरोग्यकेंद्र बंद ठेवून रुग्णांच्या जिवाशी खेळले जात आहे. रुग्णांना खाजगी दवाखान्यात जावे लागत असून, आर्थिक भुर्दंड सोसावा लागत आहे. या ठिकाणी सकाळी ओपीडी वेळ 8.30 चा असताना या ठिकाणी वेळेत एकही डॉक्टर आणि कर्मचारी उपस्थित नव्हते, त्यामुळे आता यावर कोणाचाच अंकुश नसल्याचे स्पष्ट झाले. तर या ठिकाणी सुरक्षा रक्षक देखील हजर नसल्याने आरोग्य केंद्र रामभरोसे असल्याचे दिसत आहे. दि.28 सप्टेंबर ला ठिकाणी एकही कर्मचारी वेळेत उपस्थित नव्हते. चांदूर बाजार तालुका आरोग्य अधिकारी हे माध्यमाच्या प्रतिनिधी यांना अनेक वेळा भ्रमणध्वनीला प्रतिसाद देत नाही. त्यांना तालुक्याची माहिती असल्याने त्याच्या कडून माहिती घेण्यासाठी संपर्क केला जातो, मात्र त्यांना प्रतिसाद देत नसल्याने आता यावर जिल्हा आरोग्य अधिकारी हे तालुका आरोग्य अधिकारी डॉ.उज्वला डकरे यांना समज देणार आहे.

### मुख्यालयी डॉक्टर, कर्मचारी बेपत्ता

या ठिकाणी काम करणारे डॉक्टर आणि कर्मचारी तसेच इतर स्टॉप हा मुख्यलयीन राहत नसून आवडेल तेथून येथे उपडाऊन करतात, याकडे मात्र तालुका आरोग्य अधिकारी यांचे दुर्लक्ष केले जात असल्याचा आरोप परिसरातील नागरिक यांनी केला आहे.

शिरजगाव कसबा येथील आरोग्य मंदिर मध्ये उपचारासाठी गेले असता या ठिकाणी सकाळी साडेआठ वाजताची ओपीडीची वेळ असताना एकही डॉक्टर, कर्मचारी नर्सिंग स्टाफ उपस्थित नव्हता. तसेच सुरक्षा रक्षक या ठिकाणी उपस्थित नव्हता, त्यामुळे कोटयवधी रुपयांच्या इमारतीला कोण वाली असा प्रश्न या ठिकाणी आहे. गैरहजर असणाऱ्या संबंधितावर तत्काळ कारवाई करणे आवश्यक आहे.

**अक्षय मेटांगे, देऊरवाडा**

### तालुका आरोग्य अधिकारी यांना मिळणार समज

### जिल्हा आरोग्य अधिकारी करणार कारवाई ?

आपल्या कर्तव्याच्या ठिकाणी वेळेत उपस्थित राहणे आवश्यक आहे. शिरजगाव कसबा येथील आरोग्य केंद्रात जे अधिकारी डॉक्टर कर्मचारी अनुपस्थित होते त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल, तसेच तालुका आरोग्य अधिकारी यांना माध्यमांच्या प्रतिनिधींना प्रतिसाद देत नसल्याबाबत त्यांना समज देण्यात येईल.

**डॉ.सुरेश आसोले, जिल्हा आरोग्य अधिकारी**
**जि.प.अमरावती.**

# इंदिराबाई मेघे महाविद्यालयात विविध उपक्रम

**अमरावती –** राष्ट्रीय सेवा योजना स्थापना दिन आणि पोषण आहार सप्ताहानिमित्त इंदिराबाई मेघे महिला महाविद्यालयात आयोजित आरोग्य तपासणी शिबिराला विद्यार्थिनींनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. यात महाविद्यालयाच्या कर्मचाऱ्यांची ही आरोग्य तपासणी करण्यात आली. शिबीराचे आयोजन राष्ट्रीय सेवा योजना पथक, गृह अर्थशास्त्र विभाग, जिल्हा सामान्य रुग्णालयातील सिकलसेल तपासणी, एड्स तपासणी, हिमोग्लोबीन तपासणी चमूने महाविद्यालयाच्या परिसरात आरोग्य तपासणी केली.सुरवातीला शिबिराचे उद्घाटन वैराग्यमूर्ती संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आले. यावेळी प्राचार्या डॉ. सीमा अढाऊ, विदर्भ यूथ सोसायटीच्या कार्यकारिणी सदस्य प्रा. डॉ. पूनम चौधरी, मनोज पाटील, श्री. होले, तेजस्विनी डाफे, रश्मी पिंपळे, आरती इंगळे, नीता गोंगटे उपस्थित होते.

# महाराष्ट्र वैश्य सोनार समाज भवन येथे भूमिपूजन संपन्न

**आ.प्रविण पोटे यांच्या निधीतून होणार विकास**



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.29 ) –** माजी राज्यमंत्री, माजी पालकमंत्री भाजपा अमरावती शहर–जिल्हा अध्यक्ष आ.प्रविण पोटे पाटील यांच्या निधीअंतर्गत न्यू गणेश कॉलनी (प्रभाग क्रमांक 17) मधील महाराष्ट्र वैश्य सोनार समाज भवन करिता भरीव निधी देण्यात आला. या निधीअंतर्गत समाज भवनाचे वॉटर प्रुफिंग करणे, पेव्हींग ब्लॉक बसविणे तसेच इतर कामे करण्यात येणार असून याचे भूमिपूजन आ.प्रविण पोटे यांच्या हस्ते करण्यात आले. समाजातील लोकांनी एकोपा जोपासत समाजपयोगी कार्यक्रम, धार्मिक कार्यक्रम करत जनजागृती करण्याचे आवाहन यावेळी संवाद साधताना प्रविण पोटे यांनी केले तसेच यापुढेही विकास कामांकरिता मदत करण्याचे आश्वासन प्रविण पोटे यांनी दिले. समाज भवनाच्या विकासाकरिता भरीव निधी दिल्याबद्दल महाराष्ट्र वैश्य सोनार समाजाच्या वतीने आ.प्रविण पोटे यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी तुषार भारतीय, चेतन गावंडे, दीपक पोहेकर यांच्यासह सचिन रासने, इंदु खारकर, सुनंदा खरड, नीलेश काजे, मिलिंद बांबल, लाविना हर्षे, स्वाती कुळकर्णी व महाराष्ट्र वैश्य सोनार समाजाचे मान्यवर नागरिक उपस्थित होते.

# आदिवासी बांधवांना होणार न्याय दानात सुलभता !

**चिखलदऱ्यात ग्राम न्यायालयाचे उद्घाटन | उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ नागपूर न्यायाधीशयांच्या हस्ते लोकार्पण**



**महासागर प्रतिनिधी**

**चुरणी,( दि.29 )–** प्रथमच चिखलदरा येथे ग्राम न्यायालय सुरू झाल्याने चिखलदरा तालुक्यातील नागरिकांना न्यायासाठी होणारी पायपीट थांबणार आहे. कोर्टात येणाऱ्या नागरिकांचे इतरही तालुक्याच्या काम या ठिकाणी होणार आहेत. त्यामुळे या भागातील नागरिकांमध्ये समाधानाची भावना आहे. मुंबई येथील उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती विनय जोशी यांच्या शुभहस्ते न्यायालयाचे उद्घाटन करण्यात आले.

मेळघाट हा परिसर दुर्गम व आदिवासी बहुल असून चिखलदरा तालुक्यातील आदिवासी बांधवांना आता पर्यंत न्याय मिळवण्यासाठी अचलपूर येथे जावे लागत होते. त्यामुळे आदिवासी बांधवांचा वेळ आणि पैसा दोन्ही खर्च व्हायचा. परंतु आता ग्राम न्यायालयामूळे हे थांबणार आहे. न्यायालयाच्या उद्घाटनाच्या वेळी या कार्यक्रमात प्रामुख्याने अमरावतीचे प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश सुधाकर यारलगड्डा, अचलपूर तालुका वकील संघाचे अध्यक्ष एड.रवींद्र गोरले, ग्राम न्यायालय चिखलदरा येथील न्यायाधीश सुकृत म्हातारमारे हे प्रामुख्याने उपस्थित होते. आदिवासी बांधवांना अचलपूर येथे येताना जास्त दूर होते त्यामुळे त्यांचा आर्थिक नुकसान होत होते तसेच वेळही वाया जात होता, परंतु आता या ग्राम न्यायालय मुळे या लोकांचा वेळ व पैसा वाचणार आहे. तसेच यांना लवकरात लवकर न्याय मिळेल तसेच या लोकांना न्याय मिळवून देण्यासाठी आम्ही गरीब लोकांना निशुल्क सेवा देण्यासाठी सुद्धा तयार आहोत, अशी प्रतिक्रिया एड.सुशीलकुमार नांदेकर यांनी बोलताना सांगितले.

यासह न्यायाधीश आर.डी. चौगुले, एस. पी. भोर, एस. एन. पाटील, पी. आर. गुप्ता, आर.बी.वेहपाढे तसेच या कार्यक्रमाला एड.सुशील नांदेकर, एड.नितीन चौधरी, विजय गोडबोले, संतोष बोरेकर, दिलीप खेरडे, विजयराव गाठे, अथर इकबाल, आशिष बदरके यांच्यासह वकील नागरिक पदाधिकारी सामाजिक कार्यकर्ते, अधिकारी चिखलदरा पंचायत समितीचे गटविकास अधिकारी जीवन भिलावेकर चिखलदऱ्याचे तहसीलदार जीवन मोरणकर तसेच सर्वच विभागाचे अधिकारी या ठिकाणी उपस्थित होते.

### लवकरच कायमस्वरुपी न्यायालय

न्यायमूर्ती विनय जोशी बोलताना म्हणाले की न्याय आपल्या दारी ग्राम न्यायालय ही संकल्पना 2008 पासून राबविण्यात येत आहे नागरिकांना न्याय लवकर मिळावे या उद्देशाने प्रत्येक नागरिकाला न्याय खर्चिक न होता लवकर न्याय मिळावे या उद्देशाने हे न्यायालय सुरू करण्यात आले. आदिवासी नागरिकांना न्यायदान सुलभतेने मिळावे यासाठी दर शुक्रवारी हे न्यायालय या ठिकाणी चालविल्या जाणार आहे. दिवाणी व फौजदारी खटले या ठिकाणी चालणार आहेत. काही दिवसानंतर या ठिकाणी कायमस्वरूपी न्यायालय सुरू करण्यात येणार आहे, त्यासाठी आमचा प्रयत्न राहील असेही बोलताना न्या.जोशी म्हणाले.

### जागेमूळे लांबले ग्राम न्यायलय

चिखलदरा न्यायालयाची मागणी 2008 पासून प्रलंबित होती. परंतु कृषी जागा उपलब्ध झाली नव्हती परंतु आता जागा उपलब्ध झाली आहे. लोकांच्या दारी न्याय शासनाची व नाही यंत्रणेची संकल्पना होती. यातून मेळघाटातील आदिवासी गोरगरीब जनतेसाठीहे ग्राम न्यायालय स्थापन करण्यात आले आहे. त्यामुळे लोकांना जो विलंब न्याय मिळण्यासाठी लागत होता. तो इथे विशेष न्यायालय सुरू झाल्यामुळे न्यायदानाला या ठिकाणी आता गती येईल व आदिवासी लोकांना या ठिकाणी न्याय मिळेल, अशी प्रतिक्रिया अचलपूर वकील संघ अध्यक्ष एड.रवींद्र गोरले यांनी बोलताना सांगितले.

# महिला उद्योजकांना एमआयडीसीत प्राधान्याने जागा देणार

**उदय सामंत : विश्वकर्मा योजनेत 30 हजार किट वाटप**



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.29 )–** उद्योग क्षेत्रामध्ये राज्य आघाडीवर आहे. उद्योग क्षेत्रामध्येही स्त्री सक्षमीकरणाच्या दृष्टीने महिलांचा टक्का वाढविण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे. महिला उद्योजकांना प्रोत्साहन देण्यासाठी एमआयडीसीच्या क्षेत्रामध्ये स्वतंत्र भूखंड उपलब्ध करून दिले जातील, अशी माहिती उद्योगमंत्री उदय सामंत यांनी दिली. शुक्रवारी महाराष्ट्राची उद्योगभरारी कार्यक्रम शहरात पार पडला. यावेळी आमदार रवी राणा, एमआयडीसी असोसिएशनचे अध्यक्ष किरण पातूरकर आदी उपस्थित होते.

ग्रामीण पातळीवर रोजगार निर्माण करणारी विश्वकर्मा योजना अमरावती जिल्ह्यात चांगल्या पद्धतीने राबविण्यात आली आहे. या योजनेत 50 हजारच्या जवळपास नोंदणी झाली. यातील 30 हजार लाभार्थीना किटचे वाटप करण्यात आले. दोन वर्षात 35 हजार युवकांना प्रशिक्षण देण्यात आले आहे. ग्रामीण पातळीवरील रोजगारासह मोठे उद्योग राज्यात येण्यासाठी उद्योग विभाग कार्य करीत आहे. राज्यातील एकही उद्योग बाहेर जाऊ दिल्या जाणार नाही. त्यासोबतच गडचिरोली सारख्या जिल्ह्यात स्टील क्षेत्रातील गुंतवणूक होण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहे. येत्या एक वर्षात येथील चित्र बदलेले असेल. संपूर्ण बाजारपेठेचा उद्योग क्षेत्राशी संबंध येतोच. त्यामुळे सामाजिक सक्षमीकरण करताना उद्योग क्षेत्राचा विचार करावाच लागतो. लाडकी बहीण योजनेतून महिलांचे सक्षमीकरण करीत असताना त्यांना मिळालेल्या मदतीतून बाजार पेठेतील आवश्यक वस्तूंची खरेदी होत असल्यामुळे एका दृष्टिकोनातून अर्थव्यवस्थेला चालना मिळाली आहे. त्यामुळे राज्याचा आर्थिक कणा मजबूत करण्यासाठी उद्योग क्षेत्राचा विकास करणे गरजेचे आहे. विदर्भाचा विकास व्हावा यासाठी नांदगाव पेठ येथे पीएम मित्रा टेक्सटाइल पार्क उभारण्यात येणार आहे. उद्योग क्षेत्रात सक्षमीकरणाच्या दृष्टीने ही महत्त्वाची नांदी आहे. कार्यक्रमात विविध योजनांच्या लाभार्थ्यांना लाभाचे वितरण करण्यात आले.

### माहिती न देणाऱ्या एमआयडीसीच्या अधिकाऱ्यांना देऊ नोटीस

जिल्ह्यातील नवनवीन आलेले उद्योग तसेच आलेल्या कंपन्यांविषयी एमआयडीसीचे आरओ माहिती देत नसल्याची तक्रार उद्योगमंत्री उदय सामंत यांच्याकडे पत्रकारांनी केली. यावेळी संबधित आरओ यांनी असे करू नये, त्यांनी जे काही चांगलं किंवा वाईट असेल ती माहिती माध्यमांना द्यायला हवी. दर आठवड्याला एमआयडीसीमध्ये घडणाऱ्या घडामोडींची माहिती देण्याची नोटीस आरओंना देणार असल्याचे उदय सामंत म्हणाले.